**ठळक बातम्या**

- होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासह इतर मुद्द्यांवर इराणबरोबरच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात असल्याचा अमेरिकेच्या अध्यक्षांचा दावा
- ‘इबोला’ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या भागात प्रवास टाळावा अशी केंद्र सरकारची सूचना
- पश्चिम बंगाल मधे फाल्टा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या देबगांशु पांडा यांचा मोठ्या मताधिक्यानं विजय
- २३ वर्षांखालच्या आशियाई कुस्ती स्पर्धेत भारताची आज एक सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकांची कमाई

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबईत झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा मुंबई इंडीयन्सवर ३० धावांनी विजय

**<><><><><>**

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासह इतर मुद्द्यांवर इराणबरोबरच्या वाटाघाटी इस्राएल आणि इतर मित्रदेशांबरोबर चर्चा करुन अंतिम टप्प्यात आणल्या असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. लौकरच याबाबतची घोषणा केली जाईल, असं त्यांनी ट्रुथ सोशल या समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

इराणच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बकाई यांनी सांगितलं की अमेरिकेबरोबरची चर्चा प्रगतीपथावर आहे. मात्र त्याचा अर्थ, सर्वच कळीच्या मुद्द्यांवर सहमती झाली, असा नव्हे, असं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिका परस्परविरोधी वक्तव्य करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

आफ्रिकेतल्या काही देशांमध्ये ‘इबोला’ या आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, भारतीय नागरिकांनी पुढची सूचना मिळेपर्यंत काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या भागात प्रवास टाळावा अशी सूचना केंद्रसरकारने जारी केली आहे. तसंच या देशांमध्ये वास्तव्याला असलेल्या किंवा प्रवास  करणाऱ्यांनी स्थानिक प्रशासनानं जारी केलेल्या सूचनांचं पालन करावं असं यात म्हटलं आहे. भारतात अद्याप इबोला आजाराचा एकही रुग्ण आढळला नसल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

दरम्यान, ‘इबोला’ या आजाराच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आरोग्य विषयक आणीबाणीच्या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून, भारताने आज 'आफ्रिका सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन'कडे तातडीच्या वैद्यकीय मदतीची पहिली फेरी  पाठवली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल मधे फाल्टा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या देबगांशु पांडा यांचा मोठ्या मताधिक्याने  विजय झाला. पांडा यांना १ लाख ४९ हजार मतं मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार शंभुनाथ कुर्मी यांना केवळ ४० हजार ६४५ मतं मिळाली. तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहांगीर खान यांनी मतदानाच्या दोन दिवस आधी आपण निवडणूक लढवायला इच्छुक नसल्याचं सांगत भाजपाला  पाठिंबा जाहीर केला होता,  मात्र त्यांची उमेदवारी मागे घेण्यात आली नव्हती. माघार घेऊनही त्यांना सात हजार मतदारांनी पसंती दर्शवली.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र  व्यवहार मंत्री मार्को रुबियो यांच्यामध्ये आज नवी दिल्लीतील हैदराबाद हाऊस इथं द्विपक्षीय

बैठक झाली. यावेळी सेमीकंडक्टर उद्योग, दुर्मीळ खनिजं, याबाबत भारत आणि अमेरिका यांच्यात सहकार्याचं धोरण आखण्यावर सहमती झाल्याचं जयशंकर यांनी बैठकीनंतरच्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. मार्को रुबियो यांनी दोन्ही मोठ्या लोकशाही देशातलं धोरणात्मक सहकार्य अधोरेखित केलं.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनीही अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो यांची नवी दिल्लीत भेट घेतली. यावेळी दोघांमधे संरक्षण, सुरक्षा आणि धोरणात्मक तंत्रज्ञान सहकार्य या विषयावर चर्चा झाली.

**<><><><><>**

व्हिएतनाम मधे सुरू असलेल्या २३ वर्षांखालच्या आशियाई कुस्ती स्पर्धेत भारतानं आज एक सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकं पटकावली.

पुरुषांच्या ग्रीको - रोमन स्पर्धेत ६३ किलो वजनी गटात भारताच्या सुमीत दलालने अंतिम सामन्यात उझबेकिस्तानच्या खेळाडूचा १२-२ असा पराभव करत सुवर्ण पदकावर नाव कोरलं. ५५ किलो वजनी गटात नीरज पटेलने कजाकस्तानच्या खेळाडूचा ८-० असा आणि ८७ किलो वजनी गटात रोहित बुरा याने किरगीजस्तानच्या खेळाडूचा ९-० असा पराभव करत कांस्य पदकं पटकावली.

महिलांच्या फ्रीस्टाईल प्रकारात भारताने आज एक कांस्य आणि दोन रौप्य पदकं पटकावली. ५० किलो वजनी गटात भारताच्या स्विटी हिला व्हिएतनामच्या गॉक लिन्ह दो हिच्याकडून ७-५ असा पराभव पत्करावा लागला,त्यामुळे स्विटीला रौप्य पदक मिळालं. ५९ किलो वजनी गटात नेहा सांगवान हिलाही उजबेकीस्तानच्या खेळाडूविरोधात झालेल्या सामन्यात पराभव झाल्यामुळे रौप्य पदक मिळालं. तर ५५ किलो वजनी गटात अहिल्या शिंदेनं किरगीजस्तानच्या खेळाडूचा पराभव करत कांस्य पदक जिंकलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं मुंबई इंडीयन्सवर ३० धावांनी विजय मिळवला. मुंबई इंडीयन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. राजस्थान रॉयल्सनं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून २०५ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबई इंडीयन्सला २० षटकात ९ गडी गमावून १७५ धावाच करता आल्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना कोलकाता इथं कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सुरु आहे. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण  करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दिल्ली कॅपिटल्सच्या ८ षटकात एक बाद ७० धावा झाल्या होत्या.

<><><><><>

बिहारमधे  रांची इथं आयोजित 'फेडरेशन चषक ॲथलेटिक्स' स्पर्धेत गुरिंदरवीर सिंह यानं पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या स्पर्धेत राष्ट्रीय विक्रम नोंदवत  सुवर्ण पदक जिंकलं. याबरोबरच तो आगामी ग्लासगो इथं आयोजित - राष्ट्रकुल स्पर्धेसाठीही पात्र ठरला. गुरिंदरवीर यानं १० सेकंद नऊ मिली सेकंद अशी विक्रमी वेळ नोंदवली. या स्पर्धेत अनिमिष कुजूर यानं दुसरं, तर  प्रणव प्रमोद नं तिसरं स्थान मिळवलं.

पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत टी के विशालने देखील ४४ सेकंद ९८ मिलिसेकंदांचा राष्ट्रीय विक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकलं. मात्र त्याची राष्ट्रकुल स्पर्धा पात्रता हुकली.

<><><><><>

सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात अनेक मोठ्या संधी निर्माण होणार आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. जागतिक पुरवठा साखळीचा प्रभावी भाग बनायचं असेल, तर आपल्याला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होणं अत्यावश्यक आहे, असं ते म्हणाले नागपूर जिल्ह्यात गोंडखैरी इथं गोदाम लॉजिस्टिक्स पार्कचं उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज झालं. त्यावेळी ते बोलत होते. नागपूर आणि गडचिरोली भागात आता मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत, लॉजिस्टिक्स क्षेत्रातही वाढ होत आहे, यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असून गोदाम लॉजिस्टिक्स पार्क नागपूरच्या विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

मालवाहतुकीत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झाला तर इंधन खर्चात बचत होईल, आणि लॉजिस्टिक्सवर होणारा खर्चही कमी होईल, असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले. हे पार्क १०५ एकर जागेत उभारलं असून यासाठी सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

**<><><><><>**

प्राईम पॉईंट फाउंडेशन या खासगी संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या यंदाच्या ‘संसद रत्न’ पुरस्कारांसाठी १२ खासदार आणि ४ संसदीय समित्यांची निवड झाली आहे. महाराष्ट्रातून श्रीकांत शिंदे, हेमंत सावरा, स्मिता वाघ, नरेश म्हस्के आणि मेधा कुलकर्णी या खासदारांची या पुरस्काराच्या विविध श्रेणींमध्ये निवड झाली आहे. तसंच चरणजित सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालची कृषी समिती, भर्तृहरी महताब यांच्या अध्यक्षतेखालची वित्त समिती, सप्तगिरी शंकर उलका यांच्या अध्यक्षतेखालची ग्राम विकास आणि पंचायती राज समिती आणि अनुराग ठाकूर

यांच्या अध्यक्षतेखालची कोळसा आणि खाण समिती, या ४ संसदीय समित्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

<><><><><>

गोवरसदृश्य आजारामुळे बांगलादेशात गेल्या २४ तासात सोळा जण दगावले. या आजाराने या वर्षात ५२८ जण मृत्यूमुखी पडले आहेत. या वर्षीच्या मार्चपासून बांगलादेशात ८ हजार ६०० रुग्णांना  गोवराची लागण झाल्याची पुष्टी केल्याची माहिती आरोग्यसेवा महासंचालनालयानं केलं आहे. बांगलादेशाने वॅक्सिन खरेदीला केलेल्या दिरंगाईमुळे लसींचा तुटवडा पडून नियमित लसीकरण मोहिमेवर परिणाम झाल्याचं युनिसेफनं म्हटलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं म्यानमार आणि भारत या बांगलादेशाच्या शेजारील देशांना या आजाराच्या प्रादुर्भावाबाबत दक्षता बाळगण्याचं आवाहनही केलं आहे.

<><><><><>

रशियानं युक्रेनची राजधानी ‘क्वीव’ मधल्या बिला त्सेर्कवा शहरावर काल रात्री केलेल्या हल्ल्यात २ जण ठार झाले. रशियानं ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या सहाय्यानं केलेल्या या हल्ल्यात शक्तिशाली स्वनातीत ओरेश्निक बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर केल्याचं युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. या हवाई हल्ल्यामुळे राजधानीतल्या अनेक इमारतींचं नुकसान झालं असून ७० हून अधिक लोक जखमी झाल्याचं झेलेन्स्की यांनी सांगितलं.

//<><><><><>//